**L. C. BILL No. XVII OF 2026.**

A BILL
TO AMEND THE BHARATIYA NAGARIK SURAKSHA SANHITA, 2023, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७.**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२३ चा ४६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**२.** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त संहिता" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १५ मधील, "पोलीस अधीक्षक" या मजकुराऐवजी, "सहायक पोलीस आयुक्त किंवा उप विभागीय पोलीस अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२३ चा ४६.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ९८ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ९८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ख) मधील, "दृश्य प्रतिरूपण" या मजकुरानंतर, "किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल अभिलेख" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १०७ ची सुधारणा.

**४.** उक्त संहितेच्या कलम १०७ मध्ये, पोट-कलम (१) मधील " पोलीस आयुक्ताच्या" या मजकुरानंतर, "किंवा सह पोलीस आयुक्ताच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १२९ ची सुधारणा.

**५.** उक्त संहितेच्या कलम १२९ मध्ये , खंड (च) मधील, उप-खंड (एक) मधील,—

(१) परिच्छेद (छ) मधील, "किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल;

(२) परिच्छेद (छ) नंतर, पुढील परिच्छेद जादा दाखल करण्यात येईल :—

"(ज) अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५; किंवा". १९८५ चा ६१.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १७० ची सुधारणा.

**६.** उक्त संहितेच्या कलम १७० मध्ये,—

(१) पोट-कलम (२) मधील, "जर तिची" या मजकुरानंतर, "पोट-कलम (३) अन्वये किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(३) (क) जेव्हा एखाद्या व्यक्तीला या कलमाखाली अटक केली असेल आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा ज्याच्यासमोर अटक केलेल्या व्यक्तीला हजर केले असेल त्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास,-

(एक) ती व्यक्ती, तिची सुटका केल्यानंतर, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला दखलपात्र अपराध, करण्याचा बेत रचण्याचे चालू ठेवण्याचा संभव आहे किंवा तो अपराध करण्याचा संभव आहे; आणि.

(दोन) प्रकरणाची परिस्थिती अशी असेल की, ती मोकळी राहणे हे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरण्याचा संभव आहे,

या कारणावरून अटक केलेल्या व्यक्तीची स्थानबद्धता, अटकेच्या वेळेपासून (अटक केलेल्या व्यक्तीला अटकेच्या ठिकाणापासून न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयात नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी वगळून) चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी आवश्यक आहे असे समजण्यास वाजवी कारण असेल त्या बाबतीत, अटक करणारा अधिकारी, किंवा पोलीस ठाण्याचा अंमलदार अधिकारी, अशा अटक केलेल्या व्यक्तीची स्थानबद्धता, चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी चालू ठेवण्याची कारणे नमूद करणाऱ्या लेखी अहवालासह, अटक केलेल्या व्यक्तीला सर्वात जवळच्या न्याय दंडाधिकाऱ्यासमोर हजर करील;

(ख) या संहितेमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा अटक केलेल्या व्यक्तीला ज्याच्यासमोर हजर करण्यात आले असेल त्या न्याय दंडाधिकाऱ्याची, अशा व्यक्तीला चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी तात्पुरत्या स्थानबद्धतेत ठेवण्याकरिता वाजवी कारणे आहेत अशी खात्री पटली असेल त्या बाबतीत, तो, अशा व्यक्तीला, वेळोवेळी, आदेशाद्वारे, त्याला योग्य वाटेल अशा अभिरक्षेत पाठवू शकेलः

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, या कलमान्वये एका वेळी, पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी, आणि अशा व्यक्तीच्या अटकेच्या तारखेपासून एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक होईल इतक्या कालावधीसाठी, स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(ग) जेव्हा एखाद्या व्यक्तीला, खंड (ख) अन्वये अभिरक्षेत पाठविण्यात येते त्या बाबतीत, दंडाधिकारी, शक्य तितक्या लवकर, ज्या कारणावरून आदेश काढण्यात आला आहे ती कारणे त्याला कळवील आणि अशा व्यक्तीला, त्या आदेशाविरुद्ध, सत्र न्यायालयाकडे अभिवेदन करता येईल. सत्र न्यायाधीश, असे अभिवेदन प्राप्त झाल्यावर, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर, ते अभिवेदन फेटाळू शकेल किंवा अटक केलेल्या व्यक्तीला आणखी स्थानबद्धतेत ठेवणे आवश्यक नाही असे त्याला वाटले तर किंवा अन्यथा तसे करणे योग्य व न्याय्य वाटले तर, तो आदेश विलोपित करू शकेल आणि त्यानंतर, अटक केलेल्या व्यक्तीला तात्काळ मुक्त करण्यात येईल.".

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १७३ ची सुधारणा.

**७.** उक्त संहितेच्या कलम १७३ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (एक) मधील, "चौदा दिवसांच्या" या मजकुराऐवजी, "सहा आठवड्यांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ४८२ ची सुधारणा.

**८.** उक्त संहितेच्या कलम ४८२ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः—

"(१क) अटकपूर्व जामीन मागणाऱ्या अर्जदाराची उपस्थिती, अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या वेळी आणि न्यायालयाने अंतिम आदेश देते वेळी, सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावरून, न्यायाच्या हितार्थ न्यायालयाला अशी उपस्थिती आवश्यक वाटत असेल तर, अनिवार्य असेल.".

ɣ

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) ही, भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) या खालील आणि फौजदारी अपराधांचे नियमन करणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्याखालील अपराधांचे अन्वेषण, चौकशी आणि न्यायचौकशी करण्याच्या प्रक्रियेचे विनियमन करते.

**२.** पोलीस दलाची परिणामकारकता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या विवक्षित कलमांमध्ये सुधारणा करणे, इष्ट आहे असे शासनास वाटते.

**३.** प्रस्तावित सुधारणा पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) उक्त संहितेच्या कलम १५ मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासनास, विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून संबोधण्यात येईल अशा, पोलीस अधीक्षकाच्या किंवा समतुल्य दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल. सहायक पोलीस आयुक्ताची किंवा उप विभागीय पोलीस अधिकाऱ्याची, त्यांच्या अधिकारितेतील अपराधांचे अन्वेषण करण्यामध्ये अधिक सक्रिय भूमिका असते. म्हणून, प्रशासकीय संरचनेत बदल झाल्यामुळे, उक्त कलम १५ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, सहायक पोलीस आयुक्ताच्या किंवा उप विभागीय पोलीस अधिकाऱ्याच्या किंवा समतुल्य दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्ती करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

(दोन) उक्त संहितेच्या कलम ९८ मध्ये अशी तरतूद आहे की, जेव्हा ज्या मजकुराचे प्रकाशन करणे हे, भारतीय न्याय संहिता, २०२३ (२०२३ चा ४५) याच्या कलम १५२ किंवा कलम १९६ किंवा कलम १९७ किंवा कलम २९४ किंवा कलम २९५ किंवा कलम २९९ या अन्वये शिक्षापात्र आहे असा कोणताही मजकूर, कोणत्याही वृत्तपत्रात किंवा पुस्तकात, किंवा कोणत्याही दस्तऐवजात, मग त्याचे मुद्रण कोठेही झालेले असो, - अंतर्भूत आहे, असे राज्य शासनाला दिसून येईल, त्या बाबतीत, राज्य शासनाला, असे वृत्तपत्र किंवा असे पुस्तक किंवा असा दस्तऐवज सरकारजमा झाला असल्याचे घोषित करता येईल आणि त्यासाठी झडती अधिपत्र काढता येईल. उक्त कलमातील, ‘दस्तऐवज’ या संज्ञेत, कोणतेही रंगचित्र, रेखाचित्र किंवा छायाचित्र, अथवा अन्य दृश्य प्रतिरूपण यांचा समावेश आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या कलम २ च्या खंड (८) अन्वये ‘दस्तऐवज’ या संज्ञेची व्याख्या केलेली असून, त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक व डिजिटल अभिलेखांचा देखील समावेश आहे. म्हणून, भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या उक्त कलम ९८ च्या प्रयोजनासाठी स्पष्टता आणण्याकरिता, दस्तऐवज या संज्ञेच्या अर्थांतर्गत, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल अभिलेखांचा समावेश करण्याच्या दृष्टीने, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

(तीन) उक्त संहितेच्या कलम १०७ च्या पोट-कलम (१) मध्ये अशी तरतूद केली आहे की, पोलीस अधिकाऱ्यास, एखाद्या गुन्हेगारी कृत्याचा परिणाम म्हणून किंवा कोणताही अपराध करण्यातून मिळविलेल्या किंवा प्राप्त केलेल्या मालमत्तेच्या जप्तीसाठी पोलीस अधीक्षकांच्या किंवा पोलीस आयुक्तांच्या मान्यतेने न्यायालयाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. अशी मान्यता तातडीने मिळण्याच्या दृष्टीने, उक्त कलम १०७ च्या पोट-कलम (१) मध्ये सुयोग्य सुधारणा करून, अशा अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे आणि असे अधिकार, स्थानिक पातळीवरील सह पोलीस आयुक्तांना देखील देणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

(चार) उक्त संहितेच्या कलम १२९ विवक्षित अधिनियमांखालील अपराध करणाऱ्या सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीसाठी जामीन घेण्याची तरतूद, मध्ये केली आहे. अंमली औषधिद्रव्ये

व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) खालील अपराध, उक्त कलम १२९ च्या कक्षेत येत नाहीत. अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कायदा अंमलबजावणी एजन्सींची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने, उक्त कलमात सुयोग्य सुधारणा करून, अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१) खालील अपराध, उक्त कलम १२९ च्या कक्षेत आणणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

(पाच) जेव्हा अटक केलेली व्यक्ती, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरण्याचा संभव असेल त्याबाबतीत, दंडाधिकाऱ्याच्या प्राधिकाराखालील सुयोग्य प्रकरणांमध्ये तिला, एका वेळी पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी, परंतु तीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी अभिरक्षेत पाठविण्याची तरतूद करण्यासाठी उक्त संहितेच्या कलम १७० मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), महाराष्ट्र राज्यात लागू असताना, १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ द्वारे त्यामध्ये प्रस्तावित सुधारणा केली होती. उक्त नवीन संहितेद्वारे उक्त संहिता निरसित करण्यात आली आहे, त्यामुळे, उक्त संहितेमध्ये, उक्त तरतूद समाविष्ट नाही. म्हणून ही सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(सहा) दखलपात्र प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्यासाठी प्रथमदर्शनी प्रकरण अस्तित्वात आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी उक्त संहितेच्या कलम १७३ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, प्राथमिक चौकशी करण्याचा कालावधी चौदा दिवसांवरून सहा आठवड्यांपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे.

(सात) अटक होण्याची धास्ती असलेल्या आणि अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीची उपस्थिती, अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या वेळी आणि न्यायालयाने अंतिम आदेश देतेवेळी आणि, तसेच सरकारी अभियोक्त्याने केलेल्या अर्जावरून, न्यायाच्या हितार्थ न्यायालयाला अशी उपस्थिती आवश्यक वाटेल तेव्हा, सुनिश्चित करण्यासाठी उक्त संहितेच्या कलम ४८२ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यामध्ये, १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ अन्वये ही प्रस्तावित सुधारणा करण्यात आली होती. उक्त संहितेद्वारे फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ निरसित करण्यात आल्याने उक्त संहितेमध्ये उक्त तरतूद अंतर्भूत नाही. म्हणून, ही सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक २ जुलै, २०२६. मुख्यमंत्री.

## सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७. — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

### (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ मधील उतारे.)

### (सन २०२३ चा ४६)

**१. ते १४.** *** *** *** ***

**१५.** राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा मुदतीकरता, विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून ओळखण्यात यावयाचे असे कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीस अधीक्षक किंवा त्याच्या समतुल्य दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, विशिष्ट क्षेत्रांकरिता किंवा विशिष्ट कार्ये पार पाडण्याकरिता, नियुक्त करू शकेल, आणि ते या संहितेखाली कार्यकारी दंडाधिकाऱ्याला जे अधिकार प्रदान करण्याजोगे असतील त्यांपैकी त्याला योग्य वाटतील अशा विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना प्रदान करू शकेल. विशेष कार्यकारी दंडाधिकारी.

**१६. ते ९७.** *** *** *** ***

**९८.** (१) *** *** *** *** विवक्षित प्रकाशने समपहृत करण्यात आल्याचे घोषित करण्याचा व त्यासाठी झडती वॉरंटे काढण्याचा अधिकार.

(२) या कलमात व कलम ९९ मध्ये,-

(क) *** *** *** ***

(ख) “दस्तऐवज” यात कोणतेही रंगचित्र, रेखाचित्र किंवा छायाचित्र किंवा अन्य दृश्य प्रतिरूपण यांचा समावेश आहे.

(३) *** *** *** ***

**९९. ते १०६.** *** *** *** ***

**१०७.** (१) जेव्हा अन्वेषण करणाऱ्या एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास, एखाद्या गुन्हेगारी कृत्याचा एक परिणाम म्हणून किंवा कोणत्याही अपराध्याच्या कृत्यातून कोणतीही मालमत्ता अर्जित किंवा प्राप्त केलेली असल्याचे सकारण वाटेल त्याबाबतीत, त्यास, पोलीस अधीक्षकाच्या किंवा पोलीस आयुक्ताच्या मान्यतेने, अशा मालमत्तेच्या जप्तीसाठी, अपराधाची दखल घेण्याची किंवा त्या प्रकरणाची सुनावणी किंवा न्यायचौकशी करण्याची अधिकारिता वापरणाऱ्या न्यायालयाकडे किंवा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. मालमत्ता जप्त, समपहृत किंवा परत करणे.

(२) ते (८) *** *** *** ***

**१०८. ते १२८.** *** *** *** ***

**१२९.** जी व्यक्ती,— सराईत अपराध्याकडून चांगल्या वागणुकीसाठी जामीन.

(क) ते (ङ) *** *** *** ***

(च) (एक) पुढील अधिनियमांपैकी म्हणजे,—

(क) ते (च) *** *** *** ***

(छ) अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ (२००६ चा २४); किंवा यांपैकी एका किंवा अधिक अधिनियमांखालील कोणताही अपराध; किंवा

(दोन) *** *** *** ***

करण्यास सरावलेली आहे, किंवा तो करण्याचा प्रयत्न करते, किंवा तो करण्यास अपप्रेरणा देते, किंवा

(छ) *** *** *** ***

अशी एखादी व्यक्ती आपल्या स्थानिक अधिकारितेत आहे अशी जेव्हा कार्यकारी दंडाधिकाऱ्यास खबर मिळेल तेव्हा, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने असा दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीपुरते अशा व्यक्तीला चांगली वागणूक ठेवण्यासाठी जामीनदारांसह जामीन बंधपत्र निष्पादित करण्याचा आदेश तिला का देऊ नये याचे कारण दाखविण्यास त्या व्यक्तीला फर्मावू शकेल.

**१३०.** ते **१६९.** *** *** *** ***

दखलपात्र अपराध करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अटक.

**१७०.** (१) *** *** *** ***

(२) पोट-कलम (१) अन्वये अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, या संहितेच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही संहितेच्या किंवा कायद्याच्या अन्य कोणत्याही तरतुदींन्वये आणखी स्थानबद्धता आवश्यक नसेल किंवा प्राधिकृत केलेली नसेल तर, तिच्या अटकेच्या वेळेपासून चोवीस तासांपेक्षा अधिक काळापर्यंत अभिरक्षेत स्थानबद्ध केले जाणार नाही.

**१७१.** व **१७२.** *** *** *** ***

दखलपात्र प्रकरणांतील खबर.

**१७३.** (१) व (२) *** *** *** ***

(३) कलम १७५ मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींना बाध न येता, जो तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक परंतु सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीच्या शिक्षेस पात्र असेल, असा कोणताही दखलपात्र अपराध घडल्यासंबंधीची खबर मिळाल्यावर, पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकारी पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने, त्या अपराधाचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेऊन,—

(एक) चौदा दिवसांच्या कालावधीच्या आत त्या बाबतीतील कार्यवाहीसाठी सकृतदर्शनी प्रकरण अस्तित्वात आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी प्राथमिक चौकशी सुरू करील;

(दोन) *** *** *** ***

(४) *** *** *** ***

**१७४.** ते **५३१.** *** *** *** ***

**अनुसूची.** *** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १७.]**

**[भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई